जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAR 2018
लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त दूर शिक्षण केंद्र आयोजित वेब रेडिओवरील संदेशाचे लोकार्पण, विद्यापीठ वाय-फाय प्रकल्पाचे उद्घाटन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. यावेळी मान्यवर उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात वेब रेडिओ, वाय-फाय प्रकल्प

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ५४ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त सोमवारी दूर शिक्षण केंद्र आयोजित वेब रेडिओवरील संदेशाचे लोकार्पण व विद्यापीठ वाय-फाय प्रकल्पाचे उद्घाटन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते व्यवस्थापन परिषद सभागृहामध्ये करण्यात आले.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, विद्यापीठीय ज्ञानातून, तत्त्वज्ञानातून, समाजाची विविध, क्षेत्रांतील प्रगती अधिक गतिमान करण्याच्या दृष्टीने, ज्ञानवृद्धीसाठी कार्यक्रम प्रसारित करणे हा वेब रेडिओच्या निर्मितीमागील मुख्य उद्देश आहे.

विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रामार्फत सुरु करण्यात येत असलेला हा एक अत्यंत महत्त्वाचा स्तुत्य उपक्रम आहे. विद्यार्थ्यांसह श्रोत्यांना या वेब रेडिओच्या कार्यक्रमांचा मोठा लाभ होईल तसेच विद्यापीठ वाय-फाय प्रकल्पामुळे संशोधनास चालना मिळणार असून निश्चितपणे याचा उपयोग विद्यापीठातील सर्व घटकांना होणार आहे.

या कार्यक्रमास प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठातील व्यवस्थापन परिषद सदस्य, कुलसचिव, सिनेट सदस्य आदी उपस्थित होते. यावेळी प्रास्ताविक व स्वागत कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी तर सूत्रसंचालन समन्वयक डॉ. नितीन रणदिवे यांनी केले तसेच दूरशिक्षण केंद्राचे उपकुलसचिव कॅप्टन डॉ. एन. पी. सोनजे यांनी आभार मानले.

2 1 MAR 2018 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उपक्रमांची माहिती पोचविण्यात वेब रेडिओ यशस्वी : डॉ. शिंदे

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या उपक्रमांची माहिती समाजापर्यंत पोचवण्यात वेब रेडिओ निश्चितपणे यशस्वी होईल, असा विश्वास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे व्यक्त केला.

विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळ्यानिमित्त दूर शिक्षण केंद्र आयोजित वेब रेडिओवरील संदेशाचे लोकार्पण व विद्यापीठ वाय-फाय प्रकल्पाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. व्यवस्थापन परिषद सभागृहामध्ये कार्यक्रम झाला.

डॉ. शिंदे म्हणाले की, विद्यापीठातील उपक्रमांना चालना देण्यासाठी विद्यापीठाचे स्वतःचे एक प्रभावी माध्यम म्हणून वेब रेडिओ निश्चितपणे महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडेल. विद्यापीठीय ज्ञानातून, तत्त्वज्ञानातून समाजाची विविध क्षेत्रांतील प्रगती अधिक गतिमान करण्याच्या दृष्टीने, ज्ञानवृध्दीसाठी कार्यक्रम प्रसारित करणे हा वेब रेडिओच्या निर्मितीमागील मुख्य उद्देश आहे. विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्रामार्फत सुरू करण्यात येत असलेला हा एक स्तुत्य उपक्रम आहे. विद्यार्थ्यांसह श्रोत्यांना या वेब रेडिओच्या कार्यक्रमांचा मोठा लाभ होईल.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे वेब रेडिओवरील संदेशाचे लोकार्पण व विद्यापीठ वाय-फाय प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. नितीन सोनजे आदी.**

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठातील व्यवस्थापन परिषद सदस्य, कुलसचिव, सिनेट सदस्य उपस्थित होते. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. दूर शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव कॅप्टन डॉ. एन. पी. सोनजे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAR 2018
पुढारी

# विद्यापीठात वेब रेडिओ व वाय-फाय प्रकल्पाचे उद्‌घाटन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या ५४ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त दूरशिक्षण केंद्राच्या वेब रेडिओवरील संदेशाचे लोकार्पण व वाय-फाय प्रकल्पाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते व्यवस्थापन परिषद सभागृहामध्ये करण्यात आले. या कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठातील व्यवस्थापन परिषद सदस्य, कुलसचिव, सिनेट सदस्य आदी उपस्थित होते. यावेळी प्रास्ताविक व स्वागत कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी तर सूत्रसंचालन समन्वयक डॉ. नितीन रणदिवे यांनी केले, तसेच दूरशिक्षण केंद्राचे उपकुलसचिव कॅप्टन डॉ. एन. पी. सोनजे यांनी आभार मानले.

21 MAR 2018
महाराष्ट्र टाइम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाइम्स
वाट स्वच्छ आरोग्याची


# हवे तेव्हा... सॅनिटरी पॅड

Anuradha.kadam
@timesgroup.com
Tweet : anuradhakadamMT

अर्जुन टाकळकर



सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशिनचा विद्यार्थिनींकडून वापर केला जातो.


पॅड वापरानंतर दाहिनी मशिनमध्ये जाळून नष्ट केले जाते.

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सावित्रीबाई फुले मुलींच्या वसतिगृहात हवे असतील त्या वेळेत आणि आवश्यक असतील तितके सॅनिटरी पॅड देणारे 'सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन' कार्यान्वित करण्यात आले आहे. नाममात्र पाच रुपयांना एक याप्रमाणे पॅड मिळत असल्यामुळे विद्यार्थिनींकडून या मशीनच्या वापर करण्याचे प्रमाण वाढत आहे. पॅडची विल्हेवाट लावण्यासाठी दाहिनी मशीनही ठेवण्यात आले आहे. त्यामुळे पॅडच्या वापरानंतर उद्भवणारा पर्यावरणाच्या प्रदूषणाचा प्रश्न सोडवण्यात आला आहे.

शिवाजी विद्यापीठात मुलींची तीन वसतिगृहे आहेत. यामध्ये १३०० मुली राहतात. मुलींना अचानक सॅनिटरी पॅडची गरज लागली तर तातडीने पॅड उपलब्ध होतील याची खात्री नव्हती.

## शिवाजी विद्यापीठ वसतिगृहात सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशिन

विद्यापीठाच्या ग्राहक सेवा केंद्रात पॅड विक्रीसाठी असतात. मात्र, रात्री पॅडची गरज पडली तर मुलींसाठी गैरसोय होत होती. या समस्येचा विचार करून विद्यापीठाच्या वसतिगृहासाठी असलेल्या आर्थिक बजेटमधून सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन बसवण्याचा निर्णय जुलै २०१७ मध्ये घेण्यात आला. एका खाजगी कंपनीकडून सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन व बर्निंग इन्स्लेटर (दाहिनी) मशीन विकत घेण्यात आले. यापैकी सॅनिटरी पॅड व्हेंडिंगमशीन वसतिगृहातील आतील व्हरांड्यात बसवण्यात आले आहे. दाहिनी मशीन बाथरूममध्ये लावण्यात आले.

एकावेळी या व्हेंडिंग मशीनमध्ये १०० पॅड ठेवण्याची व्यवस्था आहे. पाच रुपये मशीनमध्ये टाकल्यास एक पॅड मशीनमधून बाहेर येते. वसतिगृह व्यवस्थापनाच्यावतीने कंपनीकडून पॅड खरेदी केली असून आवश्यकतेनुसार ती मशीनमध्ये रिफिल करण्यात येतात.

दाहिनी मशीनद्वारे विल्हेवाट

सॅनिटरी पॅडच्या वापरानंतर ती कागदात गुंडाळून कचरा कोंडाळ्यात टाकण्यात येत असल्यामुळे पर्यावरण प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर येतो. पॅडसाठी वापरण्यात येणारे बाह्यआवरण केवळ कागदात गुंडाळून बाहेर टाकल्याने नष्ट होत नाही. परिणामी पॅडची योग्य विल्हेवाट लावण्याचेही आव्हान आहे. मात्र याचाही प्रश्न शिवाजी विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृह व्यवस्थापनाने निकालात काढला. दाहिनी मशीनमध्ये एकावेळेस ३० पॅड जळून नष्ट होण्याची सुविधा आहे. पॅडच्या वापरानंतर दाहिनी मशीमध्ये नष्ट करण्यासाठी टाकणे मुलींना बंधनकारक आहे.

"

**गेल्या आठ महिन्यांपासून सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन व दाहिनी मशीनचा वापर वसतिगृहातील मुली करतात. हे मशीन देणाऱ्या विक्रेत्यांकडून त्यासाठीचे पॅड एकाचवेळी खरेदी केल्याने ते कमी किंमतीत मुलींना देणे शक्य झाले. त्यामुळे मुलींच्या अडचणी थांबल्या आहेत.**

**- प्रतिमा पवार,** चीफ रेक्टर, मुलींचे वसतिगृह

**यापूर्वी पॅडची गरज पडली तर राजारामपुरीतील दुकानांपर्यंत मुलींना जावे लागत होते. त्यातही विद्यापीठाच्या नियमांनुसार मुलींना रात्री साडेआठनंतर वसतिगृहातून बाहेर पडता येत नाही. आता या पॅड व्हेंडिंग मशीनमुळे खूप सोय झाली आहे.**

**- ऐश्वर्या पाटील,** विद्यार्थिनी

2 1 MAR 2018
पुण्यनगरी
जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विविध रोगांवर गुणकारी सूप

## विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे संशोधन

**कोल्हापूर / वैभव गोंधळी :** कर्करोग, रक्तदाब अशा रोगांवर गुणकारी सुपाची निर्मिती शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ फूड सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी केली. या सुपामुळे रोगप्रतिकार शक्ती वाढविण्याबरोबरच लठ्ठपणावरही मात करता येणार आहे. मोठ्या प्रमाणात या सुपाची निर्मिती केल्यास अगदी स्वस्त दरात या सुपाचा लाभ रुग्णांना घेता येणार आहे, असा दावा संशोधक विद्यार्थ्यांनी केला.

कर्करोग आणि रक्तदाबाने ग्रासलेल्या रुग्णांनी नियमित औषध उपचारासोबतच योग्य आहार घेणे महत्त्वाचे आहे. अशाच आहाराचे संशोधन शिवाजी विद्यापीठाच्या फूड सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजीच्या एम. एस्सी. द्वितीय वर्षात शिकणाऱ्या अक्षय जाधव, सिद्धार्थ चव्हाण आणि धनश्री शिंदे या तिघांनी केले आहे. या सुपामुळे कॅन्सर रुग्णाच्या चांगल्या पेशी वाढणार आहेत, तर त्रासदायक पेशी कमी होणार आहेत. त्याचबरोबर रक्तदाब आणि कोलॅस्टेरॉल लेव्हल कमी करण्यास हे सूप मदत करते. ज्यांना वजन कमी करावयाचे आहे, त्यांच्यासाठीही उपयुक्त आहे.

या सुपामध्ये कोबी, पालक, बिन्स, राजिगरा, डाळिंब्याची साल, लवंग, काळी मिरी, लसूण, टोमॅटोचे साल, क्रीम आणि बटर यांचा विशिष्ट प्रमाणात अंतर्भाव करण्यात आला आहे. पंधरा ग्रॅमच्या सूप पावडरमध्ये अडीचशे मिली पाणी मिसळून गरम करून हे सूप घेता येणार आहे. पंधरा ग्रॅमच्या पाकिटाची किंमत पन्नास रुपये आहे. मात्र, मोठ्या प्रमाणात या सुपाचे उत्पादन केल्यास याची किमत कमी होईल, असा विश्वास या विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. त्यांना डॉ. अभिजित गाताडे, डॉ. दीपाली जाधव यांनी मार्गदर्शन केले.

**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथमहोत्सवातील स्टॉलमध्ये आरोग्यदायी सुपाची माहिती देताना विद्यार्थी. दुसऱ्या छायाचित्रात कोल्हापुरी गुळापासून तयार केलेले चॉकलेट दाखविताना विद्यार्थी. (छाया : एस. अली)**


## कोल्हापुरी गुळापासून पौष्टिक चॉकलेट

शिवाजी विद्यापीठात संशोधक विद्यार्थी असलेल्या वैभव बागे आणि स्वप्ना जोशी यांनी गुळापासून चॉकलेटची निर्मिती केली आहे. या चॉकलेटमुळे येथील ऊस आणि गूळ उद्योगाला मोठा फायदा होणार आहे. शिवाय पौष्टिक अशा चॉकलेटची मेजवानी आपल्याला चाखावयास मिळणार आहे. या चॉकलेटमध्ये गुळासह खजूर, काजू, बदाम, शेंगदाणे यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. मोठ्या प्रमाणात उत्पादन करून हे पौष्टिक चॉकलेट बाजारात आणण्यासाठी हे विद्यार्थी सध्या प्रयत्न करत आहेत. तसेच या पदार्थांचे मार्केटिंग करण्यासाठी त्यांनी विद्यापीठाच्या ग्रंथमहोत्सवात आपले स्टॉल लावले आहेत. विद्यापीठानेही या विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीस चालना देण्यासाठी मोफत स्टॉल दिला.

जनसंपर्क कक्ष
2 1 MAR 2018 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तुरंबेतील बापलेकीने एकाचवेळी मिळवली वकिलीची पदवी

## शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात पदवी प्रदान



वकिलीची पदवी मिळवणारे मुलगी स्नेहल हातकर, वडील कुंडलिक हातकर.

**चक्रेश्वरवाडी /प्रतिनिधी :** अखंडपणे ३० वर्षांपासून शिक्षकी पेशातून वेगळा ठसा उमटवणारे व शिक्षणाची आणि शिकण्याची आस मनाशी बाळगून वकिलीची पदवी प्राप्त करण्याचा योग तोही त्यांच्याच मुलीसोबत एकाच दिवशी असा दुग्धशर्करा योग शिक्षण वतुर्ळात आला. तुरंबे (ता. राधानगरी) येथील कुंडलिक पांडुरंग हातकर व त्यांची मुलगी स्नेहल कुंडलिक हातकर यांनी विधी शिक्षणक्रमाची पदवी एकाच महाविद्यालयात शिकत संपादित केली. शिकण्याची अखंड जिद्द बाळगत सेवानिवृत्तीला अवघी सात वर्षे बाकी असताना हातकर यांनी विधी विभागाची पदवी घेत समाजापुढे नवा आदर्श ठेवला आहे.

तुरंबे छोटेखानी गावात शेतकरी कुटुंबातून शिक्षणाचे धडे घेत हातकर यांनी डी. एड. पदवीनंतर गेल्या तीस वर्षात स्पर्धा परीक्षा शिष्यवृत्ती व नवोदय आणि वक्तृत्व स्पर्धेतून आपली वेगळी ओळख निर्माण केली. 'मी आणि माझा बाप' या डॉ. नरेंद्र जाधव यांच्या पुस्तकाचा त्यांच्यावर प्रभाव आहे. त्यामध्ये बाप आपल्या मुलाला जे उद्दिष्ट तू ठरवशील त्यातील तू टॉपर असावास, हे विधान त्यांच्या मनावर कायम कोरल्याने मी नेहमीच परिश्रमाला महत्त्व देत कार्य करत आल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे केवळ शिक्षक म्हणून न थांबता त्यांनी विधी विभागाची पदवी प्राप्त केली. त्यांची कन्या स्नेहलने नवोदय विद्यालय कागल व त्यानंतर पदवी घेत विधी महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यामुळे तुरंबेसारख्या ग्रामीण भागातील बापलेकींचा एकाचवेळी शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात गौरव होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. त्यांच्या या यशाबद्दल या बापलेकीचे कौतुक होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 MAR 2018
सकाळ

# प्रा. डॉ. देशमुख यांची नियुक्ती



कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक, यूजीसीचे बीएसआर फॅकल्टी फेलो प्रा. डॉ. एम. बी. देशमुख यांची सोलापूर विद्यापीठाच्या अधिसभेवर (सिनेट) राज्यपालांनी नियुक्ती केली. प्रा. डॉ. देशमुख गेली ४० वर्षे अध्यापनाचे काम करत असून आजपर्यंत त्यांनी ४० पीएचडी, ११ एमफिलच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ३०० पेक्षा जास्त संशोधन पत्रिका प्रकाशित केल्या आहेत. शिवाजी विद्यापीठाचा गुणवंत शिक्षक, महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार त्यांना मिळाला आहे. त्यांनी ग्राझ विद्यापीठात पोस्ट डॉक्टरल संशोधन, दक्षिण कोरियाच्या हनियांग विद्यापीठात अध्यापनाचे काम केले आहे. रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. जी. एस. गोकावी, प्राध्यापकांनी त्यांचे अभिनंदन केले.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# प्राध्यापकाने घेतला वृक्षलागवडीचा ध्यास


**जागतिक वन दिन विशेष**

Sachin.patil1
@timesgroup.com
Tweet : sachinpMT

अध्यापन करतानाच निसर्गसंवर्धनासाठी काम उभारावे, या हेतूने त्यांनी प्रयत्न सुरु केले. कॉलेज संपल्यानंतरचा वेळ सामाजिक कामासाठी देता येईल, या अनुषंगाने प्रा. डॉ. शकील शेख यांनी 'अंतर्नाद' नावाने सामाजिक संस्था सुरु केली. या संस्थेच्या माध्यमातून सध्या वनविभागाच्या कागलमधील उद्यानात 'अमर जवान स्मृती उद्यान' विकसित केले जात आहे. त्यांनी दहा हजार झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. अध्यापन आणि सामाजिक कार्याचा मेळ घालत त्यांनी वृक्षसंवर्धनासाठी स्वखर्चातून काम सुरु केले आहे.

प्रा. शेख मूळचे अहमदनगर जिल्ह्यातील कोळवडीचे. रयत शिक्षण संस्थेत त्यांनी कोपरगाव व मलकापूर या ठिकाणी इंग्रजीचे अध्यापन केले आहे. सध्या ते येथील राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी प्राध्यापक मित्रांना एकत्र करून सामाजिक संस्थेची स्थापना केली. दर महिन्याला पगारातील काही रक्कम ते वाचवतात, त्यातून झाडे लावतात. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी कोल्हापूर व नगर जिल्ह्यात १ हजार रोपे लावून ती जगवलीही आहेत. संपूर्ण शास्त्रीयदृष्ट्या अभ्यास करून ते वृक्षारोपण करतात. रोप लावल्यानंतर त्याची जबाबदारी स्वतंत्र व्यक्तीवर सोपवली जाते. याकामी त्यांना शाहू कॉलेजमधील शंभरपेक्षा जास्त विद्यार्थी सहकार्य करतात. दीर्घायुष्य असणारी आणि जास्त प्रमाणात ऑक्सिजन देणाऱ्या वृक्षांची रोपे लावली जातात. त्यातही आंबा, पिंपळ, वड, चिंच, कडूनिंब, अर्जुन, फणस, अशी देशी झाडे लावण्यास प्राधान्य दिले जाते.

या झाडांना पाणी कमी पाणी लागते. ती चांगली तग धरतात. पक्षी घरटे करतील, अशी देशी झाडे लावली जातात.



**"** पर्यावरणासंबंधी गंभीर समस्या जाणवत आहेत. उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. पर्यावरण वाचविण्यासाठी झाडे लावण्याशिवाय पर्याय नाही. वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाच्या कामात तरुणांचा प्रत्यक्ष सहभाग चांगला मिळाला. प्रत्येक शाळा कॉलेजात असे ग्रुप तयार झाल्यास मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करता येईल.

**- प्रा. डॉ. शकील शेख**

## वनविभागाचे सहकार्य

प्रा. शेख यांना शासनाच्या वनविभागाने जैवविविधता उद्यान कागल येथे वृक्षारोपणासाठी जागा दिली आहे. या ठिकाणी अमर जवान स्मृती उद्यान तयार केले जाणार आहे. सध्या या ठिकाणी काम सुरु आहे. आगामी पावसाळ्यात दहा हजार झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. यासाठी त्यांना शासनाने पाणीपुरवठ्याची सोय उपलब्ध करून दिली आहे.